मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# कॉंक्रिट प्रकल्पांमुळे वाकड, पुनावळेतील हवा प्रदूषित

## तत्काळ कार्यवाही करावी; गृहनिर्माण संस्थांनी केली मागणी

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
महापालिका हद्दीलगत असलेल्या मारूंजीमधील रेडी मिक्स कॉंक्रिट (आरएमसी) प्रकल्पांमुळे वाकड, ताथवडे, पुनावळेतील हवा प्रदूषणात वाढ झाली आहे. यामुळे नागरिक त्रस्त झाले असून, आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत प्रशासनाने तत्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी परिसरातील गृहनिर्माण संस्थांनी केली आहे.राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडेही याबाबत तक्रार करण्यात आली आहे. महापालिका हद्दीलगत असलेल्या मारूंजीत दहा आरएमसी प्रकल्प आहेत. हे प्रकल्प चोवीस तास सुरू असतात. रात्री-अपरात्री वाहनांची वर्दळ आणि प्रकल्पांमधील मशीनचा मोठा आवाज येतो. हवा प्रदूषणासोबतच ध्वनी प्रदूषणातही वाढ होत आहे. परिसरात गृहप्रकल्पांची बांधकामे सुरू आहेत. त्यामुळे अवजड वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणावर असते. परिणामी, या भागात मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य असते.परिसरात शाळा, महाविद्यालय आणि रहिवासी क्षेत्र असल्यामुळे विद्यार्थी, नागरिकांना श्वसनाचा त्रास होत आहे. हवेच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे. अशुद्ध हवा, ध्वनी प्रदूषण नागरिक त्रस्त झाले असून, प्लांटवर तत्काळ कारवाई करावी. नागरी आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाबाबत कार्यवाही करावी. स्थानिक नागरिक, गृहनिर्माण संस्थाधारकांच्या हिताच्या दृष्टीने कायमस्वरूपी ठोस उपाययोजना कराव्यात. प्रदूषणमुक्त परिसर आणि वाहतूक कोंडीमुक्त रस्ते उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली. पिंपरी-चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशनचे उपाध्यक्ष सचिन लोंढे म्हणाले की, आरोग्य आणि पर्यावरणाबाबत महापालिका प्रशासनाने सतर्क असले पाहिजे. रहिवासी क्षेत्रातील आरएमसी प्रकल्पांमुळे नागरिकांना ध्वनी आणि हवा प्रदूषणाचा मोठा त्रास सहन करावा लागतो. वाहतूक समस्याही वाढलेली आहे. यावर प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात.महापालिकेच्या पर्यावरण विभागाचे कार्यकारी अभियंता हरविंदर बन्सल म्हणाले की, आरएमसी प्रकल्प महापालिका हद्दीत नाहीत. या प्रकल्पांमुळे वाकड, ताथवडेतील नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला पत्रव्यवहार करून कारवाई करण्याची सूचना केली जाईल.



### नागरिकांना श्वसनाचा त्रास

» राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडेही याबाबत तक्रार करण्यात आली आहे. महापालिका हद्दीलगत असलेल्या मारूंजीत दहा आरएमसी प्रकल्प आहेत. हे प्रकल्प चोवीस तास सुरू असतात. रात्री-अपरात्री वाहनांची वर्दळ आणि प्रकल्पांमधील मशीनचा मोठा आवाज येतो. हवा प्रदूषणासोबतच ध्वनी प्रदूषणातही वाढ होत आहे. परिसरात गृहप्रकल्पांची बांधकामे सुरू आहेत. त्यामुळे अवजड वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणावर असते. परिणामी, या भागात मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य असते.परिसरात शाळा, महाविद्यालय आणि रहिवासी क्षेत्र असल्यामुळे विद्यार्थी, नागरिकांना श्वसनाचा त्रास होत आहे. हवेच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे. अशुद्ध हवा, ध्वनी प्रदूषण नागरिक त्रस्त झाले असून, प्लांटवर तत्काळ कारवाई करावी. नागरी आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाबाबत कार्यवाही करावी. स्थानिक नागरिक, गृहनिर्माण संस्थाधारकांच्या हिताच्या दृष्टीने कायमस्वरूपी ठोस उपाययोजना कराव्यात.

# शक्तिशाली व बलवान भारतासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे

## २०४७ पर्यंत भारत बलवान बनविण्याचा संकल्प : भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर जगताप

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारत शक्तिशाली आणि बलवान बनविण्याचा संकल्प केलेला आहे. भारतीय म्हणून येणाऱ्या काळात आपल्या देशाला महासत्ता बनविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने योगदान द्यावे, असे आवाहन पिंपरी-चिंचवड शहर भाजपचे अध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.देशाच्या ७५ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त पिंपरी, मोरवाडी येथील पक्ष कार्यालय प्रांगणात ध्वजारोहण कार्यक्रमावेळी ते बोलत होते. यावेळी, विधान परिषद आमदार उमाताई खापरे, चिंचवड विधानसभा आमदार अश्विनी जगताप, विशेष कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, सरचिटणीस नामदेव ढाके, अजय पाताडे, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, युवा मोर्चा अध्यक्ष तुषार हिंगे, मंडल अध्यक्ष रवींद्र नांदुरकर, उपाध्यक्ष बिभीषण चौधरी, रवींद्र देशपांडे, चिटणीस मधुकर बच्चे, देवदत्त लांडे, माजी नगरसेवक राजेंद्र गावडे, सुरेश भोईर, माजी महापौर आर एस कुमार, सचिन बंदी, कामगार आघाडी अध्यक्ष नामदेव पवार, शेखर चिंचवडे, दिव्यांग सेल संयोजक शिवदास हांडे, सहकार सेल संयोजक माधव मनोरे, कायदा सेल सहसंयोजक दत्ता झुळूक, कार्यकारणी सदस्य गणेश वाळूंजकर, बेटी बचाओ बेटी पढाओ प्रकोष्ठ संयोजिका प्रीती कामतीकर, विमल काळभोर, भावना पवार, रेखा काटे, कोमल गोंडाळकर, जयश्री मकवाना, ओबीसी मोर्चा पश्चिम महाराष्ट्र संयोजक विना सोनवलकर, नितीन अमृतकर, रवींद्र प्रभुणे, धरम वाघमारे, राजेंद्र चिंचवडे, विक्रांत नवले, कार्यालय प्रमुख संजय परळीकर यांच्यासह विविध आघाड्या व प्रकोष्ठचे पदाधिकारी उपस्थित होते. आपल्याला मिळालेले स्वातंत् शतकानू शतके चिरायू ठेवायचे आहे, असे सांगून शंकर जगताप यांनी पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना ७५ व्या प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. शंकर जगताप म्हणाले, भारताने गेल्या ७५ वर्षांत आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. विविध आव्हानांचा सामना करीत जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक बनला आहे. भारताची अर्थव्यवस्था मोदी सरकारने गेल्या काही वर्षांत ७-८ % पर्यंत पोहोचविली आहे.

# मोरेश्वर शेडगे यांच्या वतीने आयुष्यमान भारत योजननेच्या लाभार्थ्यांना स्मार्टकार्ड वाटप!

## आयुष्यमान भारत योजना व मोदी ॲप संदर्भात दिली माहिती

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** भारताचे प्रधानमंत्री नरेंद्रभाई मोदी यांच्या 'मन की बात' या लोकप्रिय कार्यक्रमाचे भारतीय जनता पार्टीचे जुने निष्ठावंत कार्यकर्ते व माजी नगरसेवक ॲड.मोरेश्वर शेडगे यांच्या वतीने चिंचवडगावातील गोखले हॉल येथे आयोजन करण्यात आले होते.तसेच 'मन की बात' या कार्यक्रमाच्या निमित्ताने नगरसेवक ॲड.मोरेश्वर शेडगे आयोजित विविध लोकोपयोगी योजनांच्या शिबिरात



सहभागी झालेल्या हजारो लाभार्थ्यांना आयुष्यमान भारत योजना लाभार्थ्यांना स्मार्ट कार्ड, आधार स्मार्ट कार्ड व मतदार स्मार्ट कार्डचे चिंचवड विधानसभेच्या आमदार अश्विनी जगताप, भाजपा प्रदेश मुख्यलयाचे प्राभारी रविंद्र अनासपुरे, माजी नगरसेवक शत्रुघ्न बापू काटे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी पक्षाचे जेष्ठ नेते महेश कुलकर्णी, श्रीराम मंदिर देवस्थानचे विश्वस्त चिंतामणी बावळे, चिंचवडगाव जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष रमेश इनामदार, बी शार्प क्लासेसचे संचालक प्रा.सुनिल खर्डे सर, अखिल भारतीय ब्राम्हण महासंघाचे माजी शहराध्यक्ष प्रा.श्रीकृष्ण कुलकर्णी सर, महिलांचे व्यासपीठ प्रयास ग्रुपच्या सौ.शोभा निसळ व सौ.चंद्रकला शेडगे, भाजपा माजी शहर उपाध्यक्ष पाटीलबुवा चिंचवडे, दत्ताभाऊ चिंचवडे, शेखर चिंचवडे, भाजपा शहर सचिव मधुकर बच्चे, भाजयुमोचे प्रदेश सचिव अजित कुलथे, भाजपा ओबीसी आघाडीचे प्रदिपजी सायकर, प्रशांत आगज्ञान, फ्रेंड्स ऑफ बीजेपीचे चिंचवड विधानसभा संयोजक रविंद्र प्रभुणे, भोसरी विधानसभा विस्तारक धनंजय शाळिग्राम, पोलीस मित्र संघटनेचे सुभाषजी मालुसरे, टाटा मोटोर्सचे कामगार नेते विश्वास राऊत, भाजयुमोचे शहर सरचिटणीस शिवम डांगे, पराग जोशी, ज्ञानेश्वर मेहेरवाडे, अतुल कांबळे, शुभम मिसरी या प्रमुख कार्यकर्त्यांसह पक्षाचे चिंचवडगावातील सर्व शक्तीकेंद्र प्रमुख व बूथ प्रमुख उपस्थित होते.'मन की बात' कार्यक्रम पाहण्यासाठी चिंचवडकर नागरिक व लाभार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी आमदार अश्विनी जगताप व भाजपा प्रदेश मुख्यालय प्रभारी रवि अनासपुरे यांनी सर्व उपस्थितांशी सवांद साधत नव मतदार नोंदणी, आयुष्यमान भारत योजना व मोदी ॲप संदर्भात माहिती दिली.

# पिंपरीत पिस्तुले काडतुसे बाळगणारे गुन्हेगार जेरबंद

## दरोडा विरोधी पथकाची कारवाई

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवडच्या दरोडा विरोधी पथकाने सराईत गुन्हेगारांना अटक करून त्यांच्याकडून ३ गावठी पिस्तुले आणि ४ जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. वीरभद्र रघुनाथ देवज्ञ, राहुल बसवराज सर्जन आणि अमोल फिलिप साळवे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नाव आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस शिपाई सुमित देवकर आणि गणेश सावंत यांना बातमीदारकडून माहिती मिळाली की, वीरभद्र हा



सराईत गुन्हेगार आळंदी घाटाजवळ आला आहे. त्याने पिस्तुल बाळगले आहे. अशी माहिती मिळताच तत्काळ त्याठिकाणी जाऊन सापळा रचून वीरभद्रला ताब्यात घेण्यात आल. त्याच्याकडील एक गावठी पिस्तुल आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली.या गुन्ह्याचा अधिक तपास केल्यानंतर राहुल बसवराज सर्जन आणि अमोल फिलिप साळवे यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे अधिक चौकशी केल्यानंतर साळवेकडे दोन गावठी पिस्तुले आणि दोन जिवंत काडतुसे मिळाली. अशी एकूण तीन गावठी पिस्तुले आणि चार जिवंत काडतुसे दरोडा विरोधी पथकाने जप्त केली आहेत. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक भरत गोसावी हे करत आहेत. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

### वीरभद्रला ताब्यात घेण्यात आल

» वीरभद्र रघुनाथ देवज्ञ, राहुल बसवराज सर्जन आणि अमोल फिलिप साळवे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नाव आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस शिपाई सुमित देवकर आणि गणेश सावंत यांना बातमीदारकडून माहिती मिळाली की, वीरभद्र हा सराईत गुन्हेगार आळंदी घाटाजवळ आला आहे. त्याने पिस्तुल बाळगले आहे. अशी माहिती मिळताच तत्काळ त्याठिकाणी जाऊन सापळा रचून वीरभद्रला ताब्यात घेण्यात आल. त्याच्याकडील एक गावठी पिस्तुल आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली.या गुन्ह्याचा अधिक तपास केल्यानंतर राहुल बसवराज सर्जन आणि अमोल फिलिप साळवे यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे अधिक चौकशी केल्यानंतर साळवेकडे दोन गावठी पिस्तुले आणि दोन जिवंत काडतुसे मिळाली. अशी एकूण तीन गावठी पिस्तुले आणि चार जिवंत काडतुसे दरोडा विरोधी पथकाने जप्त केली आहेत.

# दोन्ही खेळाडूंना विस्मरणाचा झटका आलाय

## नितीशकुमार आणि भाजप नेत्यावर संजय राऊताची टीका

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
नितीश कुमार यांनी राजदबरोबरची महाआघाडी तोडून बिहारमध्ये भाजपाबरोबर एनडीएचं सरकार स्थापन केले आहे. नितीश कुमार यांनी रविवारी दुपारी राजभवनात राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा सुपूर्द केला.त्यानंतर काही तासात नितीश कुमार यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. यावरून विरोधकांनी नितीश कुमार यांच्यावर टीका करण्यास सुरुवात केली. त्या सर्व घडामोडी दरम्यान ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत हे पुणे दौर्यावर कबड्डी स्पर्धेच्या उदघाटन कार्यक्रमाला आले होते.इंडिया आघाडीमध्ये नितीश कुमार यांच नाव आघाडीवर होते. पण याच नितीश कुमार यांना भाजप सोबत घेऊन गेली आहे.त्या प्रश्नावर ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत म्हणाले की, तुमच्याकडे चुकीची



माहिती आहे.भाजपने काही दिवसापूर्वीच सांगितले होते की, नितीश कुमार आमच्या दारात हात जोडत आले.तर भाजप किंवा एनडीएमध्ये घेणार नाही. अशा प्रकारची भूमिका भाजपकडून मांडण्यात आली होती.एकवेळ मरण पत्करण, पण भाजपच्या दारात जाणार नसल्याची भूमिका नितीश कुमार यांनी देखील मांडली होती.या भूमिका पाहिल्यावर दोन्ही खेळाडूंची मानसिक स्थिती बरोबर नाही.तसेच या दोन्ही खेळाडूंना विस्मरणाचा झटका आलाय,त्यामुळे त्यांनी खेळ खेळू नये,असे सांगत बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि भाजप नेत्यावर त्यांनी टीका केली.तसेच ते पुढे म्हणाले की, कबड्डी हा खेळ हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा आवडता खेळ होता.तसेच शरद पवार यांनी देखील कबड्डी आणि कुस्ती क्षेत्रात मोठ काम केले आहे. शिवसेना असेल किंवा पवार साहेबांचा संघ असेल, काँग्रेसचा संघ असेल निवडणुका आल्यावर,या महाराष्ट्रामध्ये मैदान कोण मारणार,तर २०२४ च मैदान आम्हीच मारणार आणि त्याही पुढच मैदान आम्हीच मारणार, तसेच आम्ही पुढील संघ केव्हा मैदानात येतोय याची वाट पाहतोय.मात्र ते समोर येण्याच टाळत आहे. महापालिका निवडणुका घ्या ना, आम्ही मैदानात उभेच आहोत, तुम्ही कधी या,अशी भूमिका मांडत महायुतीवर त्यांनी निशाणा साधला. तसेच ते पुढे म्हणाले की, कबड्डी खेळात खिलाडूवृत्ती पाहण्यास मिळते.पण सध्याच्या राजकारणामधून खिलाडूवृत्ती संपवलेली आहे. हार जीत होत असते.पण आजच्या सारख सुडाच, बदला घेण्याच राजकारण अशा प्रकारच राजकारण महाराष्ट्रामध्ये कधीच घडल नव्हत, अशी भूमिका मांडत पुन्हा एकदा भाजप नेत्यावर त्यांनी टीका केली.स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल एमआयएम चे खासदार इम्तियाज जलील यांनी वादग्रस्त विधान केले आहे.त्याबद्दल संजय राऊत यांना विचारले असता ते म्हणाले की, इम्तियाज जलील आणि भाजपची हातमिळवणी आहे.त्यांनी बोलायच (इम्तियाज जलील) भाजपने प्रश्न विचारायचे,तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी हे चार दिवसापूर्वी नाशिक येथे आले होते.तर उद्धव ठाकरे हे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या घरी जाऊन आले.तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यावेळी जाऊन यायला हवे होते.त्याच बरोबर आम्ही २६ जानेवारी रोजी वाट पाहत होतो की,स्वातंत्र्यवीर सावरकर यांना भारतरत्न पुरस्कार जाहीर होईल.पण यंदाचा भारतरत्न बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकुर यांना जाहीर करण्यात आला. असे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला.भाजपने काही दिवसापूर्वीच सांगितले होते की, नितीश कुमार आमच्या दारात हात जोडत आले.

### आमच्या दारात हात जोडत आले

**» इंडिया आघाडीमध्ये नितीश कुमार यांच नाव आघाडीवर होते. त्या प्रश्नावर ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत म्हणाले की, तुमच्याकडे चुकीची माहिती आहे.भाजपने काही दिवसापूर्वीच सांगितले होते की, नितीश कुमार आमच्या दारात हात जोडत आले.तर भाजप किंवा एनडीएमध्ये घेणार नाही. अशा प्रकारची भूमिका भाजपकडून मांडण्यात आली होती.एकवेळ मरण पत्करण, पण भाजपच्या दारात जाणार नसल्याची भूमिका नितीश कुमार यांनी देखील मांडली होती.या भूमिका पाहिल्यावर दोन्ही खेळाडूंची मानसिक स्थिती बरोबर नाही.तसेच या दोन्ही खेळाडूंना विस्मरणाचा झटका आलाय,त्यामुळे त्यांनी खेळ खेळू नये,असे सांगत बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि भाजप नेत्यावर त्यांनी टीका केली.तसेच ते पुढे म्हणाले की, कबड्डी हा खेळ हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा आवडता खेळ होता.**

# राजकारणामध्ये निष्ठा, विचारांना अर्थ नाही : राजू शेट्टी

## तरुणांनी देशात लोकशाही टिकवण्यासाठी राजकारणात यावे

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
सध्याच्या राजकारणामध्ये निष्ठा आणि विचारांना अर्थ राहिलेला नाही. गुंडगिरी आणि भ्रष्टाचार वाढीला लागला आहे, असे मत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष, माजी खासदार राजू शेट्टी यांनी व्यक्त केले. राजकारणापासून दूर राहणाऱ्या तरुणांनी देशात लोकशाही टिकवण्यासाठी राजकारणात यावे, सुशिक्षित तरुण राजकारणात आला तर देशाला समर्थ नेतृत्व मिळू शकेल, असेही त्यांनी सांगितले. जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटर्फे आयोजित सातव्या युवा संसदेच्या उद्घाटनावेळी राजू शेट्टी बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष व युवा संसदेचे अध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर उपस्थित होते. याच कार्यक्रमात संजय जाधव, ओमराजे निंबाळकर यांना आदर्श खासदार पुरस्कार, माजी नगरसेवक साईनाथ बाबर यांना आदर्श नगरसेवक पुरस्कार, सरपंच दिलीप घोलप यांना



आदर्श सरपंच पुरस्कार, तर उद्योजक सनी निम्हण यांना आदर्श युवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राजू शेट्टी म्हणाले, तरुणांनी राजकारणात येण्यापूर्वी आपण राजकारणात कशासाठी येणार आहोत, हे उद्दिष्ट निश्चित करावे. राजकारण म्हणजे केवळ पैसा प्रसिद्धी सत्ता मिळवण्याचे साधन नाही तर ते समाजाची सेवा करण्याची एक संधी आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. राजकारण जर सकारात्मकतेने केले तर जनता निश्चितच आपल्या पाठीशी उभी राहते हे मी वैयक्तिक अनुभवातून आपल्याला सांगतो. राजकारणामध्ये अनेक समस्या असल्या तरी या देशाला हुकूमशाहीपेक्षा लोकशाहीच पुढे नेऊ शकते. त्यामुळे या देशातील लोकशाही टिकवण्यासाठी तरुणांनी राजकारणात आले पाहिजे. राजकारणामध्ये निष्ठा कायम ठेवली तर यश निश्चितच मिळते. राजकीय सुडापोटी माझ्या वडिलांचा खून झाल्यानंतर मी लोकांच्या प्रेमापोटी राजकारणामध्ये आलो आणि आज तळागाळातील लोकांपर्यंत माझे काम पोहोचल्यामुळे त्यांना मी त्यांच्या कुटुंबातील एक सदस्य वाटतो, हे माझ्या राजकारणाचे यश आहे. केवळ लोकांना दाखवण्यासाठी म्हणून काम करू नका. समाजाविषयी तळमळ तुमच्या कामातून दिसली तर लोक तुमच्या पाठीशी उभे राहतात, अशी भूमिका ओमराजे निंबाळकर यांनी मांडली.

# भाजपला कोणाबद्दल काही बोलण्याचा नैतिक अधिकार नाही

## भाजपची पद्धत घरफोडा : खासदार सुप्रिया सुळे

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** नितीश कुमार यांनी राजदबरोबरची महाआघाडी तोडून बिहारमध्ये भाजपाबरोबर एनडीएचे सरकार स्थापन केले आहे. नितीश कुमार यांनी रविवारी दुपारी राजभवनात राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा सुपूर्द केला. त्यानंतर काही तासात नितीश कुमार यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. यावरून विरोधकांनी नितीश कुमार यांच्यावर टीका करण्यास सुरुवात केली.नितीश कुमार यांच्या शपथविधी बाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांना विचारले असता त्या म्हणाल्या की, हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न असून शेवटी लोकशाही आहे.



तसेच मला या घटनेच्या पार्श्वभूमीवर अमित शाह यांचं एक भाषण आठवतं. नितीश कुमार यांच्यासाठी भाजपचे दरवाजे कायमसाठी बंद, त्यामुळे दिलेला शब्द सारखा फिरवायचा, ही भाजपची एक पद्धत झालेली आहे. तसेच देवेंद्र फडणवीस देखील मागील काही वर्षापुर्वी म्हणाले होते की, मी लग्न करणार नाही. मी बॅचलर राहीन, पण राष्ट्रवादी काँग्रेस सोबत जाणार नाही. त्यामुळे ही लोक (भाजप मधील नेते मंडळी) विरोधी पक्षात असतात. त्यावेळी खूप मोठी विधान करतात. एखाद्याची बदनामी करतात आणि तो व्यक्ती सोबत गेल्यावर, तपास यंत्रणांच्या माध्यमांमधून पक्ष फोडा, घरफोडा हे एवढं सर्व करून यांची सत्ता कशी येईल यासाठी प्रयत्न केले जातात. त्यामुळे भाजपला कोणाबद्दल काही बोलण्याचा नैतिक अधिकार राहिला नाही, अशा शब्दात भाजपच्या कार्यपद्धतीवर त्यांनी टीका केली.यावरून विरोधकांनी नितीश कुमार यांच्यावर टीका करण्यास सुरुवात केली.नितीश कुमार यांच्या शपथविधी बाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांना विचारले असता त्या म्हणाल्या की, हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न असून शेवटी लोकशाही आहे. तसेच मला या घटनेच्या पार्श्वभूमीवर अमित शाह यांचं एक भाषण आठवतं. नितीश कुमार यांच्यासाठी भाजपचे दरवाजे कायमसाठी बंद, त्यामुळे दिलेला शब्द सारखा फिरवायचा, ही भाजपची एक पद्धत झालेली आहे. तसेच देवेंद्र फडणवीस देखील मागील काही वर्षापुर्वी म्हणाले होते की, मी लग्न करणार नाही. मी बॅचलर राहीन, पण राष्ट्रवादी काँग्रेस सोबत जाणार नाही.

### शेवटी लोकशाही आहे

**» ही लोक विरोधी पक्षात असतात.एखाद्याची बदनामी करतात आणि तो व्यक्ती सोबत गेल्यावर, तपास यंत्रणांच्या माध्यमांमधून पक्ष फोडा, घरफोडा हे एवढं सर्व करून यांची सत्ता कशी येईल यासाठी प्रयत्न केले जातात. त्यामुळे भाजपला कोणाबद्दल काही बोलण्याचा नैतिक अधिकार राहिला नाही, अशा शब्दात भाजपच्या कार्यपद्धतीवर त्यांनी टीका केली.यावरून विरोधकांनी नितीश कुमार यांच्यावर टीका करण्यास सुरुवात केली.नितीश कुमार यांच्या शपथविधी बाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांना विचारले असता त्या म्हणाल्या की, हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न असून शेवटी लोकशाही आहे.**

# शरद मोहोळ खून प्रकरणातील आरोपींवर मोक्का कारवाई

## शरद मोहोळ खून प्रकरणातील मुख्य सूत्रधार गणेश मारणेचा शोध सुरूच

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** गुंड शरद मोहोळ खून प्रकरणातील मुख्य सूत्रधार गणेश मारणे, विठ्ठल शेलार यांच्यासह १६ आरोपींविरुद्ध पोलीस आयुक्त रितेश कुमार यांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) कारवाई करण्याचे आदेश दिले.मोहोळचा खून ५ जानेवारी रोजी कोथरुडमधील सुतारदरा परिसरात मुन्ना पोळेकर आणि साथीदारांनी पिस्तुलातून गोळ्या झाडून खून केला होता. याप्रकरणी गुन्हे शाखेने साहिल उर्फ मुन्ना संतोष पोळेकर, नामदेव महिपती कानगुडे, अमित ऊर्फ अमर मारुती कानगुडे, चंद्रकांत शाहू शेळके, विनायक संतोष गव्हाणकर, विठ्ठल किसन गांदले, ॲड. रवींद्र पवार, ॲड. संजय उडान, विठ्ठल शेलार, रामदास ऊर्फ वाघ्या मारणे, धनंजय मारुती वटकर, सतीश संजय शेडगे, नितीन अनंता खैरे, आदित्य विजय गोळे,



संतोष दामोदर कुरपे यांना अटक केली. तपासात गणेश मारणे आणि विठ्ठल शेलार मुख्य सूत्रधार असल्याचे निष्पन्न झाले होते. गुंड शरद मोहोळ खून प्रकरणातील मुख्य सूत्रधार गणेश मारणे, विठ्ठल शेलार यांच्यासह १६ आरोपींविरुद्ध पोलीस आयुक्त रितेश कुमार यांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) कारवाई करण्याचे आदेश दिले.मोहोळचा खून ५ जानेवारी रोजी कोथरुडमधील सुतारदरा परिसरात मुन्ना पोळेकर आणि साथीदारांनी पिस्तुलातून गोळ्या झाडून खून केला होता. आरोपींविरुद्ध मोक्का कारवाईचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. पोलीस आयुक्त रितेश कुमार यांनी मोक्का कारवाईचे आदेश दिले. गुन्हे शाखेचे पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे, उपायुक्त अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त सुनील तांबे तपास करत आहेत.मोहोळ खून प्रकरणाचा मुख्य सूत्रधार गणेश मारणेच्या मागावर गुन्हे शाखेची पथके आहेत. अद्याप मारणेचा ठावठिकाणा पोलिसांना लागलेला नाही. विठ्ठल शेलारसह सर्व आरोपींची येरवडा कारागृहात न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. पसार झालेल्या मारणेने त्याच्या वकिलांमार्फत अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी न्यायालयात अर्ज केला आहे.